**प्रेसनोट दि. १९/०७/२०१९**

**सिंहगडरोड पोलीस स्टेशन,पुणे**

**सिंहगडरोड पो.स्टे. येथे दाखल विनयभंगाचे गुन्हयातील आरोपीस वडगाव व धायरी मार्शलचे पोलीस कर्मचारी यांनी केले जेरबंद**

---

सिंहगडरोड पो.ठाणे गुन्हा रजि.नं. ४९४/२०१९ भा.दं.वि. कलम ३५४,३५४(अ),४५२, लैंगिक अपराधापासुन बालकांचे संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ८ व १२ या गुन्हयातील फिर्यादी महिला,वय ३२ वर्षे, रा.सिंहगडरोड, पुणे यांनी दि.१६/०७/२०१९ रोजी दुपारी ०२.०० वा.चे सुमारास त्यांच्या घराशेजारी राहणारा महादेव कृष्णाकांत कांबळे याने फिर्यादी घरामध्ये नसताना त्यांच्या घरात जावुन त्यांची मुलगी, वय ११ वर्षे हीला गणित शिकवतो असे म्हणुन तीचा विनयंभंग केला म्हणुन फिर्यादी यांनी त्याचे विरुध्द तक्रार दिल्याने गुन्हा दाखल करुन सदर गुन्हयाचा तपास महिला पोलीस उप-निरीक्षक एस.एम.क्षिरसागर ह्या करीत होत्या.

सदर गुन्हयातील आरोपी नामे महादेव कृष्णाकांत कांबळे हा हिंगणे कॅनॉललगत असणारे रोडच्या बाजुला असल्याची बातमी वडगाव मार्शलचे पोलीस कर्मचारी पोशि ८७४४ सचिन तुपसौंदर व पोशि १०११४ सुहास मोरे यांना त्यांचे बातमीदारामार्फत मिळाल्याने त्यांनी धायरी मार्शलचे पोशि ८९९३ लक्ष्मण काशीद व पोशि ७५०१ शैलेश नेहरकर यांना सदर बातमीबाबत माहिती देवुन त्यांना वडगाव ब्रिजकडुन हिंगणे कॅनॉललगत असणारे रोडला येण्यास सांगुन स्वतः हिंगणे कडुन कॅनॉललगत असणारे रोडला जावुन दाखल गुन्हयातील आरोपी नामे महादेव कृष्णाकांत कांबळे यांस ताब्यात घेवुन उत्कृष्ट कामगिरी केली आहे.

